ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३२ • सोमवार दि.२६ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## पाचशे कोटीच्या ऑडिओ प्रकरणात एसआयटी स्थापन करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

मुंबई/प्रतिनिधी-गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या ५०० कोटींच्या कथित ऑडिओ क्लिप प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना दिले आहेत.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दसरा मेळाव्यात मोठा दावा केला होता. भाजपकडून ५०० कोटी घेऊन खासदार श्रीकांत शिंदेंनी आपल्याला दिल्याची सध्या चर्चा असल्याचा दावा केला होता. हा दावा एकनाथ शिंदेंनी फेटाळून लावल्यानंतर जरांगेंनी एक ऑडिओ क्लिप माध्यमांसमोर आणली. यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली. मनोज जरांगे पाटलांनी बीडमधील नारायणगडावर झालेल्या दसरा मेळाव्यात पहिल्यांदा यावर भाष्य केले. भाजपच्या एका नेत्याकडून मला समजले की, शिवसेनेचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडे मला देण्यासाठी ५०० कोटी रुपये दिल्याचा दावा केला आहे. हे पैसे शिंदे यांचे सुपुत्र खा. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून पोहोचवण्यात आल्याची कुजबुज सत्ताधारी वर्तुळात सुरू असल्याचा आरोप त्यांनी




केला. उपमुख्यमंत्री शिंदेंनी हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. मी कोणालाही ५०० कोटी दिलेले नाहीत आणि कोणाकडून घेतलेही नाही. जरांगेंनी बोलण्यापूर्वी तथ्यांची शहानिशा करायला हवी होती. तसेच त्यांच्याकडे याबाबत काही पुरावे असतील, तर त्यांनी ते संबंधित तपास यंत्रणांकडे द्यावेत, असे आवाहनही केले होते. मनोज जरांगेंनी गुरुवारी (२२ ऑक्टोबर) जालना येथे पत्रकार परिषद घेऊन एक ऑडिओ क्लिप सार्वजनिक केली. यामध्ये, विधानसभा २०२४ निवडणुकांदरम्यानच्या भाजपच्या एका मिटिंगचा असल्याचा दावा करण्यात आला आहे. यामध्ये एक महिला मनोज जरांगेंना पाचशे कोटी मिळाले असून शिवसेना खा.श्रीकांत शिंदेंमार्फत पोहोचवण्यात आले, असल्याचे सांगताना दिसत आहे. तसेच, यामध्ये इतर काही भाजपचे नेते असल्याचा दावा करण्यात आला आहे. भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे आणि आशिष शेलार यांनी या ऑडिओ क्लिपच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तसेच, शिवसेनेच्या नेत्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना बदनाम करण्याचा कट असल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाची ईडी मार्फत चौकशी करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली आहे. पाचशे कोटी रुपयांच्या ऑडिओ क्लिपमुळे राज्यभरात भाजप व शिवसेनेची बदनामी झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदरील ऑडिओ क्लिपची चौकशी करण्यासाठी पोलीसांचे विशेष पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे निर्देश आज (सोमवार) मुंबई पोलीस आयुक्तांना दिले आहेत.

## मध्य रेल्वे पुन्हा कोलमडली; तबबल ३ तासांचा खोळंबा

मुंबई/प्रतिनिधी-मुंबई रेल्वे ही मुंबईकरांची जीवनवाहिनी आहे. या लोकलने लाखो मुंबईकर प्रवास करतात. अशामध्ये ही लोकलसेवा खोळंबली की, याचा मोठा फटका हा मुंबईला बसतो. सोमवारी (२६ ऑक्टोबर) सकाळच्या सुमारास मध्य रेल्वे मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाल्याचे समोर आले आहे. आधी ओव्हरहेड वायरवर कपडा अडकल्यामुळे मुलुंड-ठाणे दरम्यान लोकलला फटका बसला. त्यानंतर, लोकल सेवा पूर्वपदावर येते तोच पुन्हा सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्यामुळे लोकल सेवा विस्कळीत झाल्याचे समोर आले. यामुळे तब्बल तीन तासांहून अधिककाळ लोकलसेवा खोळंबल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला. दुपारी १.३० ते २ नंतर हळूहळू पूर्वपदावर येत असल्याची माहिती देण्यात आली असली तरीही अनिश्चित काळासाठी काही रेल्वे गाड्या उशिराने धावण्याची शक्यता आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, सकाळी ठाणे-मुलुंडदरम्यान अप लोकल मार्गावरील पान ४ वर

## ईजळी शिवारातील जुगार अड्डयावर पोलीसांची धाड;नऊ जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-मौजे ईजळी शिवारातील शेतामध्ये सुरु असलेल्या जुगार अड्डयावर पोलीसांनी शनिवारी धाड टाकुन नऊ जणांना अटक केली. त्यांच्या जवळून ३ लाख १७ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.

मौजे ईजळी शिवारातील रेल्वे पटरी जवळ एका शेतामध्ये जुगाराचा अड्डा सुरु होता. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या नेतृत्वाखाली पोलीसाच्या एका पथकाने शनिवारी सदरील



जुगार अड्डयावर धाड टाकली. पैसे लावून अंदरबाहर नावाचा जुगार खेळत असतांना मो.सलमान मो.युनुस (वय ३०) रा.नईआबादी,मुदखेड, कपील सोपान हटकर (वय २८) रा.ईजळी, गजानन उत्तमराव कळणे (वय ३९) रा.सरेगाव ता.मुदखेड, कृष्णा गणेश पवार (वय २१) रा.निवघा, रामप्रसाद नारायण मुचकलवाड (वय २७) रा.मेंढका, अरविंद बाबाराव मुंगल (वय २८) रा.ईजळी, गंगाधर लोंडे रा.बारड, राष्ट्रपाल दिगांबर हटकर रा.ईजळी, बालू पवार रा.निवघा यांना रंगेहाथ पकडले. पोलीसांनी त्यांच्या जवळून चार मोबाईल, तीन दुचाकी, रोख रक्कम असा ३ लाख १७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुध्द मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अमित शहा मानहानी खटल्यातून खा.राहुल गांधींची निर्दोष मुक्तता

नवी दिल्ली:केंद्रीय गृहमंत्री अमित शहांशी संबंधित मानहानीच्या खटल्यामध्ये उत्तर प्रदेशच्या सुलतानपूर न्यायालयाने काँग्रेसचे नेते व लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधींना निर्दोष मुक्त केले आहे. या निकालानंतर काँग्रेस पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी न्यायालयाबाहेर एकच जल्लोष केल्याची पाहायला मिळाले. भाजपचे नेते विजय मिश्रा यांनी २०१८ च्या ऑगस्ट महिन्यात राहुल गांधींविरुद्ध हा खटला दाखल केला होता. सोमवारी तब्बल



८ वर्षांनी या खटल्याचा निकाल समोर आला आहे.

दरम्यान, खा.राहुल गांधी हे निकालासाठी सुलतानपूर न्यायालयाकडे निघाले असतानाच त्यांच्या ताफ्यांच्या गाडीला अपघात झाला. या घटनेत तीन-चार जण किरकोळ जखमी झाले. त्यानंतरही या निकालावेळी खा.राहुल गांधी न्यायालयात उपस्थित होते. भाजप नेते आणि जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष विजय मिश्रा यांनी ४ ऑगस्ट २०१८ रोजी खा.राहुल गांधी यांच्या विरोधात मानहानीची तक्रार दाखल केली होती. त्यांनी यावेळी आरोप केला होता की, त्याच वर्षी बंगळूरुमधील एका निवडणूक रॅलीदरम्यान खा.राहुल गांधींनी अमित शहांबद्दल वादग्रस्त टिपण्णी केली होती. कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी ८ मे २०१८ रोजी बंगळूरुमध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये खा.राहुल गांधींनी २००५ च्या सोहराबुद्दीन शेख हत्याकांडाचा संदर्भ देत एक विधान केले होते. खा.राहुल गांधी म्हणाले होते की, देशातील जनता हे विसरली आहे की, भाजप अध्यक्षांवर हत्येचा आरोप आहे. ज्या पक्षाच्या अध्यक्षांवर हत्येचा आरोप आहे, तो पक्ष केवळ प्रामाणिकपणा आणि शुद्धतेबद्दलच बोलतो. असे विधान केले होते.

## दिवाळी प्रवासात जादा भाडे आकारणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स विरुद्ध तक्रार करावी

**परिवहन विभागाचे आवाहन**

नांदेड/प्रतिनिधी-दिवाळी सण व सुट्यांच्या कालावधीत प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता खासगी ट्रॅव्हल्स बसमधून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी निर्धारित भाड्यापेक्षा जादा भाडे आकारले जात असल्यास संबंधितांविरुद्ध तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बससेवेसाठी शासन किंवा सक्षम प्राधिकरणाने लागू केलेल्या विशेष सणकालीन भाडेवाढीच्या तरतुदीनुसार नियमित भाड्याच्या दीडपट भाडे आकारण्यास परवानगी आहे. मात्र कोणत्याही खासगी ट्रॅव्हल्सना मनमानी पद्धतीने यापेक्षा जादा भाडे आकारण्याचा अधिकार नाही. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासापूर्वी आकारण्यात येणाऱ्या भाड्याची खात्री करूनच तिकीट घ्यावे.खासगी ट्रॅव्हल्सकडून निर्धारित भाड्यापेक्षा जादा रक्कम आकारण्यात आल्यास प्रवाशांनी तात्काळ तक्रार नोंदवावी. तक्रारीसाठी संबंधित ट्रॅव्हल्सचे नाव, बस क्रमांक, प्रवासाचा मार्ग, प्रवासाची तारीख आणि आकारलेले भाडे याची नोंद ठेवणे आवश्यक आहे.जादा भाडे आकारल्याचा पुरावा म्हणून प्रवासाचे तिकीट व भाडे भरल्याची पावती जतन करावी. तसेच संबंधित ट्रॅव्हल्सचे नाव, बस क्रमांक, प्रवासाचा मार्ग, दिनांक आणि आकारलेले भाडे याबाबतची सविस्तर माहिती तक्रारीसोबत द्यावी.जादा भाडे आकारणीबाबतची तक्रार प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड येथे नोंदविता येईल.

## दुष्काळाने शेती उद्ध्वस्त;सरकार मात्र पंचनाम्यांच्या चक्रव्यूहात!

### बळीराजाच्या फाटक्या झोळीत मदतीचे दान कधी पडणार?

सरफराज दोसानी

माहूर:राज्यात सध्या मनोज जरांगे पाटील यांच्या ५०० कोटींच्या दाव्यावरून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दुष्काळाच्या झळांनी होरपळणाऱ्या बळीराजाचा आक्रोश सरकारच्या कानापर्यंत पोहोचतोय की नाही, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

एकीकडे राजकीय नेत्यांच्या आरोपांच्या फैरी झडत आहेत, तर दुसरीकडे शेतात उभे पीक हातचे गेलेल्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांत मदतीची आस कायम आहे. राजकारणासाठी कोट्यवधींच्या आकड्यांची चर्चा, मात्र दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पदरात मदतीचे दान कधी? हा प्रश्न आता अधिकच तीव्र झाला आहे. दुष्काळाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. सोयाबीन, कापूस, तूर यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाने पाठ फिरवली, धरणे आटली, विहिरींनी तळ गाठला



आणि शेतातील हिरवळ करपून गेली. वर्षभर घाम गाळून उभे केलेले पीक डोळ्यांदेखत उद्ध्वस्त होत असताना शेतकऱ्यांच्या संसाराचा गाडा मात्र आर्थिक संकटात रुतला आहे. अशा परिस्थितीत सरकारकडून पंचनामे, अहवाल आणि प्रस्तावांच्या नावाखाली सुरू असलेली दिरंगाई शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री, मंत्री आणि सरकारी यंत्रणा शेताच्या बांधावर पोहोचत आहेत. केंद्रीय पथकांकडूनही नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली जात आहे. कॅमेऱ्यांसमोर शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्या जातात, अधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातात आणि मदतीचे आश्वासनही दिले जाते. मात्र, या दौऱ्यांचा प्रत्यक्ष फायदा शेतकऱ्यांच्या पदरात कधी पडणार? शेतात पीक नाही, घरात पैसा नाही आणि डोक्यावर कर्जाचा डोंगर आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याचे पोट पाहणीच्या दौऱ्यांनी भरणार आहे काय? दुष्काळाचे वास्तव सरकारला दिसत नाही की दिसूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे? असा संतप्त सवाल पान ४ वर

## व्यवस्था बदलासाठी योग्य विचारांची गरज:कॉ.स्मिता पानसरे

### भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्यस्तरीय कार्यशाळेला नांदेडमध्ये प्रारंभ




नांदेड/प्रतिनिधी-देशभरात सध्या विविध प्रश्नांवर आंदोलने सुरू आहेत. या आंदोलनांमधून कदाचित सत्ता बदलेल, मात्र केवळ सत्ताबदलाने परिस्थिती बदलणार नाही. समाजातील परिस्थिती बदलायची असेल, तर व्यवस्था बदलावी लागेल आणि हा बदल योग्य वैचारिक भूमिकेतूनच शक्य आहे, असे प्रतिपादन भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या कॉ. स्मिता पानसरे यांनी केले.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या शाखा व तालुका सचिवांची राज्यस्तरीय कार्यशाळा नांदेड येथील लोकमान्य मंगल कार्यालय नवामोंढा येथील कॉ. अनंतराव नागापूरकर नगर, कॉ. गोविंद पानसरे विचार मंच येथे आज (सोमवार) सकाळी प्रारंभ झाला आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. कॉ. स्मिता पानसरे म्हणाल्या की, देशभरात विविध मागण्यांसाठी मोठ्या प्रमाणावर आंदोलने होत आहेत.मात्र, या आंदोलनांना केवळ सत्ताबदलापुरते मर्यादित न ठेवता समाजव्यवस्थेत परिवर्तन घडविण्याची दिशा मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी योग्य विचार, ठोस वैचारिक भूमिका आणि सातत्यपूर्ण जनआंदोलनांची गरज आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्ष सातत्याने वैचारिक भूमिका घेऊन आंदोलने करीत असून, याच विचारांतून व्यवस्था परिवर्तनाची दिशा निश्चित होत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे यांनी शाखा सचिवांचे पक्षसंघटनेतील महत्त्व अधोरेखित केले. शाखा सचिव हे पक्षाच्या जनआंदोलनांना वैचारिक दिशा देण्याचे महत्त्वाचे काम करतात. शाखा मजबूत झाल्याशिवाय पक्षाचा विस्तार होऊ शकत नाही. सध्या देशात जातीयवादाचा प्रभाव वाढत असल्याचे चित्र असून, सर्वसामान्य जनतेचे प्रश्नही गंभीर होत आहेत. अशा परिस्थितीत पक्षाच्या शाखा अधिक सक्षम झाल्या पाहिजेत. कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत पोहोचून त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कॉ. प्रा. राम बाहेती यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. या कार्यशाळेत पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसह आगामी जनआंदोलनांची दिशा निश्चित केली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉ. तुकाराम भस्मे, कॉ. तानाजी ठोंबरे, राज्य सचिव कॉ. सुभाष लांडे, सहसचिव कॉ. प्रा. राम बाहेती, कॉ. श्याम काळे, कॉ. नामदेव चव्हाण, कॉ. राजू देसले, कॉ. राजन क्षीरसागर, कॉ. प्रदीप नागापूरकर, कॉ. शिवाजी फुलवळे आदी उपस्थित होते. कार्यशाळेसाठी राज्यातील ३७ जिल्ह्यांतून दोनशेहून अधिक प्रतिनिधी नांदेडमध्ये दाखल झाले आहेत. आगामी दोन दिवसांत पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासह पुढील आंदोलनांची दिशा आणि कार्यपद्धती यांवर चर्चा होणार आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॉ. राजू देसले यांनी केले, तर आभार प्रदर्शन कॉ. श्याम काळे यांनी केले.

# विकास हवा,विनाश नको!

**विकासाची गरज कुणालाही नाकारता येणार नाही. उद्योग उभे राहिले पाहिजेत, वीज निर्माण झाली पाहिजे, रोजगाराच्या संधी वाढल्या पाहिजेत आणि पायाभूत सुविधांचा विस्तार झाला पाहिजे. मात्र, विकासाच्या या प्रवासात निसर्गाचा बळी देणे अपरिहार्य आहे, असे मानण्याचे कारण नाही. झाडे तोडून, जंगलांचा ऱ्हास करून आणि पर्यावरणाचा समतोल बिघडवून साधलेला विकास खरोखर विकास म्हणायचा का, हा आजचा मूलभूत प्रश्न आहे. कर्जत परिसरातील प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पासाठी वृक्षतोडीचा मुद्दा असो किंवा नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवनातील वृक्षतोडी-वरून निर्माण झालेला वाद असो, दोन्ही घटनांनी विकासाच्या संकल्पनेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वीज ही आधुनिक जीवनाची गरज आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि बदलती जीवनशैली यामुळे ऊर्जेची मागणी वाढत आहे. जलविद्युतसारखे प्रकल्प ऊर्जा निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकतात. त्याचप्रमाणे कुंभमेळ्यासारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यासाठी निवास, वाहतूक, स्वच्छता आणि अन्य सुविधांची व्यवस्था करणेही आवश्यक आहे. परंतु एखादा प्रकल्प महत्त्वाचा आहे किंवा एखादा सोहळा भव्यदिव्य करायचा आहे, म्हणून पर्यावरणीय परिणामांकडे डोळेझाक करता येणार नाही. विकासाची घाई करताना निसर्गाच्या विनाशाला मोकळीक देणे म्हणजे भविष्याच्या संकटाची पायाभरणी करणे होय.नाशिकमध्ये २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवन परिसरातील सुमारे १,८०० वृक्ष तोडण्याच्या प्रस्तावावरून मोठा वाद निर्माण झाला. साधुग्राम उभारणीसाठी वृक्षतोडीची आवश्यकता असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले, तर पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी त्याला विरोध केला. या प्रकरणात राष्ट्रीय हरित लवादाच्या हस्तक्षेपामुळे वृक्षतोडीच्या मुद्द्याला अधिक गांभीर्य प्राप्त झाले. वृक्षतोड न करता साधुग्राम विकसित करण्याच्या पर्यायावरही विचार करण्यात आला. या घडामोडी एक महत्त्वाचा प्रश्न विचारतात, मोठ्या आयोजनासाठी नियोजन करताना पर्यावरणाचे संरक्षण हा पहिलाच निकष का असू नये? कुंभमेळा हा श्रद्धेचा, परंपरेचा आणि सांस्कृतिक एकात्मतेचा उत्सव आहे. लाखो भाविकांच्या सोयीसाठी व्यवस्था करणे आवश्यकच आहे. मात्र, श्रद्धेच्या नावाखाली निसर्गाची हानी करणे योग्य ठरू शकते का? भाविकांना सुविधा देण्यासाठी पर्यायी जागांचा शोध, उपलब्ध मोकळ्या जागांचा नियोजनबद्ध वापर आणि पर्यावरणपूरक तात्पुरत्या संरचनांचा विचार करता येऊ शकतो. अशा पर्यायांचा पुरेसा अभ्यास न करता वृक्षतोड हाच सोपा मार्ग मानला जात असेल, तर प्रशासनाच्या नियोजनक्षमतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. भव्य कुंभमेळ्याची उभारणी करताना निसर्गाचे अस्तित्वच धोक्यात येणार असेल, तर त्या भव्यतेचा अर्थ काय? जंगल म्हणजे केवळ झाडांचा समूह नाही. ते पाण्याचे संवर्धन करते, मातीची धूप रोखते, जैवविविधतेचे रक्षण करते आणि स्थानिक हवामानाचा समतोल राखण्यास मदत करते. झाडे तोडल्याने होणारे नुकसान केवळ एका दिवसाचे नसते. त्याचे परिणाम अनेक वर्षे जाणवू शकतात. एखाद्या ठिकाणी जुनी झाडे तोडून दुसरीकडे नवीन रोपे लावली म्हणजे पर्यावरणीय हानी भरून निघाली, असा साधा हिशेब निसर्गाच्या बाबतीत लागू होत नाही. वाढलेली झाडे आणि त्यांच्याभोवती विकसित झालेली परिसंस्था पुन्हा निर्माण होण्यासाठी दीर्घ काळ लागतो.आज हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि पाण्याची टंचाई यांसारख्या समस्यांनी समाजासमोर गंभीर आव्हाने उभी केली आहेत. अशा परिस्थितीत वृक्षसंवर्धन ही केवळ पर्यावरणप्रेमींची मागणी नसून सार्वजनिक हिताची गरज आहे. निसर्गाचा ऱ्हास करून तात्पुरत्या गरजा भागवल्या, तर त्याची किंमत पुढील पिढ्यांना मोजावी लागू शकते. विकासाचे फायदे आज मिळतील; पण पर्यावरणाच्या हानीचे दुष्परिणाम उद्या अधिक तीव्रतेने समोर येऊ शकतात. प्रश्न विकासाला विरोध करण्याचा नाही, तर विकासाची दिशा ठरवण्याचा आहे. एखादा प्रकल्प किंवा आयोजन हाती घेताना पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास झाला पाहिजे. पर्यायी जागा, कमी हानी करणारे तंत्रज्ञान, वृक्षसंवर्धन आणि स्थानिक नागरिकांच्या हरकती यांचा प्रामाणिकपणे विचार झाला पाहिजे. पर्यावरणीय मंजुरी ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया ठरता कामा नये. मंजुरीच्या अटींचे पालन होते की नाही, यावरही प्रभावी देखरेख आवश्यक आहे. वृक्षारोपणाच्या घोषणा करण्यापेक्षा लावलेली रोपे जगवणे आणि त्यांचे संगोपन करणे अधिक महत्त्वाचे आहे. कर्जत असो किंवा नाशिक, विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी देण्याची प्रवृत्ती थांबली पाहिजे. सरकारने विकास आणि पर्यावरण यांच्यात कृत्रिम संघर्ष निर्माण करण्याऐवजी दोन्हींचा समतोल साधणारे नियोजन केले पाहिजे. लोकांच्या गरजा भागवणे हे सरकारचे कर्तव्य आहे; पण त्यासाठी भावी पिढ्यांच्या जगण्याचा आधार नष्ट करण्याचा अधिकार कोणालाही नाही. विकासाच्या प्रत्येक प्रकल्पाला विरोध नको; पण प्रत्येक प्रकल्पाला विवेकाची कसोटी हवी. रस्ते, इमारती आणि अन्य सुविधा पुन्हा उभारता येतात; मात्र नष्ट झालेली परिसंस्था पूर्ववत करणे अत्यंत कठीण असते. कुंभमेळ्याचे आयोजन यशस्वी व्हावे, वीज निर्मिती वाढावी आणि रोजगार निर्माण व्हावा, या सर्व अपेक्षा रास्त आहेत. परंतु या उद्दिष्टांसाठी निसर्गाचा विनाश अपरिहार्य मानणे चुकीचे आहे. विकासाच्या शर्यतीत निसर्गच हरला, तर त्या विजयाचा आनंद कोणाला आणि कशासाठी? विकास हवा, पण विनाशाची किंमत मोजून नको!**

# जग नास्तिक का बनते आहे?

दत्ता तुमवाड
नांदेड.



हल्ली जगाची ओढ नास्तिक बनण्याकडे दिसत आहे, आज मितिस अमेरिकेत ५० टक्के लोक नास्तिक आहेत, स्वीडनमध्ये ७८ टक्के,व्हिएतनाम मध्ये ८० टक्के, इंग्लंड मध्ये ७२ टक्के,जपान मध्ये ८६ टक्के,चीन मध्ये ९० टक्के लोक नास्तिक आहेत, बाकी साऱ्या देशात ५० टक्के ते ३० टक्के पर्यंत नास्तिक आहेत, २५० देशात म्हणजे जगात सरासरी ३० टक्के लोक नास्तिक आहेत,दरवर्षी ही टक्केवारी वाढतच आहे,पण घटत नाही. पुर्वेकडील देशापेक्षा पश्चिमेकडील देशात नास्तिकतेचे प्रमाण जास्त आहे. याचे कारण तिकडे विज्ञानाचा शोध लवकर लागला. अनेक वैज्ञानिक शोध लागले,कारण विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयात तिकडे मोठ्या प्रमाणात संशोधन आहे, आणि हे संशोधन पूर्वेकडील देशाच्या आधी हजार वर्षाचे आहे. शिक्षण घेण्याची टक्केवारी पण पाचीमाते देशात शंभर टक्के आहे. तिकडे देश संशोधनावर बराचसा पैसा खर्च करतात. त्यामुळे अनेक अनेक शोध लागले. केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानातच संशोधन झाले असे नाही तर, समाज, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र या सर्वच क्षेत्रात त्यांनी संशोधन केले, म्हणूनच पाश्चिमात्य देश वैज्ञानिक दृष्ट्या आणि बौद्धिक दृष्ट्या सर्व जगाच्या पुढे आहे, इकडे भरपूर भौतिक विकास झालेला आहे, देव धर्म आणि अंधश्रद्धा यातच ते मजबुल राहत नाहीत, तर विकासाच्या अनेक वाटा शोधीत असतात.

नास्तिकता म्हणजेच विकास आणि आस्तिकता म्हणजे अविकास किंवा जैसे थे ,असे ते म्हणतात.तिकडचे लोक परिवर्तन प्रिय आहेत,जून ते सोन म्हणीत,जुन्या पारंपरिक पुरातन गोष्टीला महत्व देत नाहीत,तर नवं ते हवं या गोष्टीस महत्व देतात.आणि इकडे विज्ञानाला मानत नाहित, विज्ञान फक्त वापरासाठीच आहे असे समजतात, विज्ञान आणि विज्ञानाचे शोध या केवळ तांत्रिक गोष्टी असून त्याचा फक्त वापर करायचा असतो, या पलीकडे त्यास काहीच महत्त्व नाही, यातून काही मोक्ष मिळणार नाही, विकास माणसाचे ध्येय नाही तर मोक्ष हे माणसाचे ध्येय आहे, मोक्षासाठी देव आणि धर्म अत्यंत उपयोगाचे आहेत, या तत्त्वज्ञानाने आशियातील नव्हे तर पृथ्वीवरील पूर्वेकडील सर्वच देश चालतात.पूर्वेकडील देश एकीकडे विकासाचाही अवलंब करतात आणि दुसरीकडे आत्मा देव मोक्ष अंधश्रद्धा या गोष्टींना महत्त्व देतात, वैज्ञानिक संशोधन आणि या संशोधनातून जे सत्य बाहेर येते, ते सत्य मानायला तयार नसतात, म्हणूनच पूर्वेकडील सारे देश पश्चिमात्य देशापेक्षा एक हजार वर्षांनी मागे आहेत. अजूनही ते सुधरत सुधारत नाहीत. सुधारण्याची त्यांची इच्छा नाही, परिवर्तन क्रांती या संकल्पना यांना जड वाटतात. म्हणूनच ते तर हे मागे आहेत, माघ असलेले देश म्हणून यांचा नावलौकिक आहे.

बरेच धार्मिक विचारवंत विज्ञानाशिवाय अध्यात्म पंगु आहे आणि अध्यात्माशिवाय विज्ञान अंध आहे, म्हणून विज्ञानाने अध्यात्माची जोड असायला हवी, विज्ञानाला म्हणजे विज्ञानवादी विचारवंतांना संशोधकांना जर अध्यात्म समजला तर ते विध्वंसक शस्त्र बनविणार नाहीत, आणि अध्यात्मवादींना जर विज्ञान कळले तर ते धर्मांध बनणार नाहीत, अंधविश्वासू होणार नाहीत असे अध्यात्मवादी विचारवंत म्हणतात.माणूस धार्मिक बनला की, तो श्रद्धावान बनतो, श्रद्धा त्याला चिकटली की, तो विचार करणे सोडून देतो, आणि जो नास्तिक असतो तो श्रद्धावान नसतो तर बुद्धिमान असतो, तो भावनेच्या आहारी न जाता बुद्धीचा वापर करतो, आणि निर्णय घेत असतो. तुम्ही नास्तिक बना म्हणजे विचार करायला सुरुवात करता, प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघता,नास्तिकांच्या डोळ्यावरील चष्मा पारदर्शक असतो, त्यांना आरपारचे दिसते, जवळचे दिसते आणि दूरवरचे दिसते. परंतु आस्तिकांच्या डोळ्यावरील श्रद्धेच्या चष्म्यातून आरपार दिसत नाही, फक्त जवळचे दिसते, आणि तेच खरे वाटायला लागते, त्यांना दूरदृष्टी नसते. म्हणूनच ते फसतात, श्रद्धावान लोकांना कोणीही चालू माणूस सहज बनवू शकतो. उदाहरणार्थ बुवा बापू चमत्कार करणारे, लोकांना अंधश्रद्धा चे शिक्षण देणारे, खोट्या आशेवर जगविणारे ढोंगी बाबा.

आस्तिक लोकांना नास्तिक लोकांचा का राग येतो ? हेच मला समजत नाही, कारण नास्तिक लोक हे अस्थिकांना आपले शत्रू समजत नाहीत, त्यांच्याशी लढाई पण करत नाहीत, उलट त्यांच्याशी बंधू भावाने वागतात, तरीही आस्तिक लोक नास्तिकांना पाण्यात पाहतात. खरे तर खरे तर कोणताही देव आणि धर्म आणि अध्यात्म कुण्याही व्यक्तीला दुखवू नये दुःख देता कामा नये, असेच सांगत असतो, दया क्षमा शांती हे तीन तत्त्व धर्माचे आहेत, परंतु धर्मांध भक्त धर्माच्या ह्या तीन तत्त्वाप्रमाणे चालत नाहीत, याचे कारण म्हणजे राजकारण, षडयंत्र, माणसा माणसात जात आणि धर्माच्या नावाने भांडणे लावण्याचे काम हे धर्म मार्तंड आणि राजकारणी लोक करीत असतात. अन्यथा नास्तिक आणि आस्तिक यांच्यात मतभेद जरी असले तरी मनभेद होण्याची आवश्यकता नाही.आस्तिक होणे आणि नास्तिक होणे, हा विषय खरे तर वैचारिक चिंतनाचा आणि मंथनाचा आहे, एवढे जरी समजले तरी कामाचे आहे.

जगाची वाटचाल नास्तिक तिकडे चालू आहे, वरचेवर नास्तिक लोकांची संख्या वाढते आहे, याचे कारण लोक आता कोणीही काहीही सांगितले तर त्यावर विश्वास न ठेवता आता विचार करायला लागले आहेत, एकदा का माणूस विचार करायला लागला की तो नास्तिकतेच्याच वाटेने जाणार, याची खात्री षडयंत्र करणाऱ्या लोकांना आहे, म्हणूनच ते बहुजनांनी शिक्षण घेऊ नये, ज्ञानी होऊ नये, विचार करू नये, यासाठीच ते लोकांना देवाधर्माच्या नादी लावतात. आणि श्रीमंत होण्याचे आपले स्वप्न पूर्ण करतात. म्हणूनच तर गरीब आणि श्रीमंत आणि मध्यम हे तीन वर्ग कधीच संपत नाहीत, यातील रुंदावलेली दरी पण कमी होत नाही. काही लोक गरीब असलेले श्रीमंत होतील, पण सारेच लोक श्रीमंत होऊ शकत नाहीत, ती गरीबच असतात, श्रीमंत असलेले गरीब होतील, गरिबी आणि श्रीमंतीचा हा पत्त्याचा डाव चालतच राहील पण वर्ग संपणार नाहीत, याचे कारण म्हणजे अस्तिक लोक. ज्या देशात जास्तीत जास्त नास्तिक लोक असतील त्या देशातील गरीब श्रीमंत मध्यम या वर्गातील अंतर निश्चितच कमी होईल. कारण समता ही नास्तिक लोक निर्माण करू शकतात, आणि विषमता ही आस्तिक लोकच निर्माण करीत असतात, कारण ते धर्मांध आणि अंधश्रद्धेत गुरफटलेले असतात.

# आसना गार्डन श्रमदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद;अवघ्या दीड तासात गार्डन चकाचक



नांदेड/प्रतिनिधी- सामाजिक बांधिलकी आणि स्वच्छतेचा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरवत, आसना मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने आसना गार्डन परिसरात भव्य स्वच्छता व श्रमदान मोहीम उत्साहात पार पडली. आसना मॉर्निंग वॉक ग्रुपचे आनंद कल्याणकर यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शेकडो नांदेडकरांनी एकत्र येऊन अवघ्या दीड तासात तब्बल पावणेदोन किलोमीटर लांबीचा संपूर्ण परिसर चकाचक केला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून आमदार बालाजी कल्याणकर यांनीही या कार्याची दखल घेत आसना गार्डनच्या विकासकामासाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे.

आनंद कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाची सुरुवात रविवारी सकाळी ६ वाजता संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व राष्ट्रगीताने झाली. कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदानाचे चोख नियोजन करण्यात आले होते. सहभागी नागरिकांना प्रत्यक्ष हॅन्डग्लोव्हज, पोती व कॅरिबॅगचे वाटप करण्यात आले. कामाची योग्य विभागणी व्हावी यासाठी प्रत्येकी १२ जणांचे वेगवेगळे गट तयार करण्यात आले होते. सुमारे पावणेदोन किलोमीटर लांब आणि ४० मीटर रुंद परिसरातील प्लास्टिक पिशव्या, रिकाम्या बाटल्या, पाकिटे व कचरा वेचून थेट घंटागाडीत जमा करण्यात आला. तसेच उपस्थित नागरिकांची रीतसर नोंद नोंदवहीत घेण्यात आली. तसेच ज्येष्ठ नागरिकांचा प्रातिनिधिक सत्कार करून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यात आला.आसना गार्डन परिसराच्या कायापालटानंतर बोलताना अध्यक्ष आनंद कल्याणकर म्हणाले की, नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरण संवर्धन या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या आहेत. ग्रुपच्या केवळ एका आवाहनावर शेकडो मॉर्निंग वॉकर्स व नांदेडकरांनी सुट्टीच्या दिवशी सकाळी एकत्र येऊन श्रमदान केले. या एकजुटीच्या जोरावरच एवढा मोठा परिसर अवघ्या दीड तासात पूर्णपणे स्वच्छ करता आला. याचे सर्व श्रेय मॉर्निंग वॉकर्स आणि पर्यावरणप्रेमींना जाते.या श्रमदान मोहिमेदरम्यान नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर यांनी प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी आनंद कल्याणकर, डॉ. भगवानराव मनूरकर यांनी आमदारांना आसना गार्डन परिसरातील विविध समस्या, पाण्याची टंचाई आणि आवश्यक उपाययोजना यांची सविस्तर माहिती दिली. यावर आ. बालाजी कल्याणकर यांनी तत्काळ प्रतिसाद देत उद्यानासाठी स्वतःकडून बोअरवेल मंजूर करण्याचे जाहीर केले. तसेच १ नोव्हेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नांदेड दौर्यावर येत असून, आनंद कल्याणकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची उपमुख्यमंत्र्यां-सोबत बैठक घडवून आणू आणि शासनाकडून गार्डनच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देऊ, असा शब्द आ.कल्याणकर यांनी दिला.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन देशमुख (तरोडेकर), संदीप देशमुख (तरोडेकर), महेश देशमुख (तरोडेकर), नवनाथ देशमुख (तरोडेकर), विश्वनाथ बाबाराव देशमुख यांच्यासह तरोड्याची मंडळी, मॉर्निंग वॉक ग्रुपचे सर्व सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुखेड शहरात महर्षी वाल्मिकी जयंती साध्या पध्दतीने साजरी



मुखेड/प्रतिनिधी-मुखेड शहरात आद्यकवी महर्षी वाल्मीकी ऋषी यांची जयंती अत्यंत उत्साहात परंतु दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर साधेपणाने साजरी करण्यात आली.या कार्यक्रमात कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सुशांतभाऊ चव्हाण आणि काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांच्या शुभहस्ते महर्षी वाल्मीकींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मारोतीमामा मामीलवाड आणि कोळी समाजाचे तालुकाध्यक्ष भारत गव्हाणकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता, मान्यवरांचा सत्कार, हारतुरे आणि इतर खर्चिक उपक्रमांना फाटा देत कोळी समाजबांधवांनी यंदाची जयंती अत्यंत साधेपणाने व आदर्श पद्धतीने साजरी केली. या प्रसंगी नगरपरिषदेचे गटनेते नागनाथ लोखंडे,माजी नगरसेवक प्र.शिवा मुद्देवाड, नगरसेवक गजानन लंगेवाड, हेमंत घाटे,प्र.दिलीप चव्हाण, छावा तालुकाध्यक्ष गिरीधर पाटील केरुरकर, साई बोईनवाड, कल्याण कांबळे हिप्परगेकर, पत्रकार राजु बनसोडे,मष्णा बद्देवाड,श्रीराम बद्देवाड बेळीकर,उद्योजक संतोष घाळेवाड,नरेश पाटील इंगोले, माधवराव तोटवाड, बाळासाहेब आकुलवाड,सुनिल तोटरे, महेश संगेवार,सुनिल वाघमारे, सुनिल कांबळे आणि साईनाथ बद्देवाड यांच्यासह विविध सामाजिक आणि राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांनी महर्षी वाल्मीकी ऋषींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.जयंतीच्या ध्वजारोहण व फोटोपूजनाचे आयोजन हणमंत नारनाळीकर यांनी केले होते,तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल बद्देवाड आणि वीरभद्र मामीलवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# खालसा फायनान्सच्या मालकासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी-माळकौठा ता.मुदखेड येथील मजुराचे अपहरण करुन मारहाण करणाऱ्या खालसा फायनान्सच्या मालकासह चार जणांविरुध्द मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दत्ता किशन गायकवाड (वय ३७) रा.माळकौठा ता.मुदखेड याने आईच्या आजारपणासाठी हिंगोली गेट भागातील खालसा फायनान्सकडून आठ हजार रुपये कर्ज घेतले होते. कर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्याने दि.६ ऑक्टोबर रोजी माळकौठा येथे खालसा फायनान्सचे मालक व इतर तीन जणांनी दत्ता गायकवाड याच्या घरी जावून कर्जाची परतफेड का करत नाहीत म्हणून जाब विचारला. चार जणांनी दत्ता गायकवाड यास जबरदस्तीने दुचाकीवर बसवून नांदेड शहरातील हिंगोली गेट भागात असलेल्या खालसा फायनान्सच्या कार्यालयात घेवून गेले. गायकवाड यास शिवीगाळ करुन काठीने मारहाण केली. त्यानंतर धनेगाव परिसरातील एका खोलीत डांबून ठेवून जीवे मारण्याची धमकी दिली. दत्ता गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मुदखेड पोलीस ठाण्यात खालसा फायनान्सच्या मालकासह चार जणांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रेती वाहतूक करणारे टिपर जप्त

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या रेती वाहतूक करणारे टिपर शनिवारी रात्री वाजेगाव रोडवर नांदेड ग्रामीण पोलीसांनी पकडले आहे.

टिपर क्र.एमएच ४२ एक्यू-२६५८ मध्ये एक ब्रास रेती भरुन अवैधरित्या विक्रीसाठी घेवून जात असतांना शनिवारी रात्री ९ च्या सुमारास नांदेड ग्रामीण पोलीसांनी वाजेगाव रोडवर पकडले आहे. पोलीसांनी टिपर व रेती जप्त केली असून याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात वाजेद पठाण जावेद पठाण व शेख मुजाहेद याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# रामगड किल्ल्याच्या हत्ती दरवाजाकडे जाणारा रस्ता खड्ड्यांच्या विळख्यात

माहूर/प्रतिनिधी-माहूर येथील वसमतकर महाराज मठ ते ऐतिहासिक रामगड किल्ल्याच्या हत्ती दरवाजाकडे जाणाऱ्या मार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे आणि पावसाच्या पाण्यासोबत वाहून आलेल्या मलब्यामुळे भाविक व पर्यटकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. धार्मिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी राज ठाकूर यांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

माहूर हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून, येथे श्री रेणुका माता मंदिर, दत्त मंदिर, सती अनुसया माता मंदिर, शेख फरीद दर्गा परिसरातील धबधबा तसेच ऐतिहासिक रामगड किल्ला अशी अनेक धार्मिक व पर्यटनस्थळे आहेत. त्यामुळे वर्षभर या ठिकाणी भाविक आणि पर्यटकांची मोठी वर्दळ असते. मात्र, या महत्त्वाच्या पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याने पर्यटकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.वसमतकर महाराज मठ ते रामगड किल्ल्याच्या हत्ती दरवाजाकडे जाणाऱ्या मार्गावर अनेक



ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाच्या पाण्यासोबत वाहून आलेल्या मलब्यामुळे रस्त्यावर चर पडले असून, काही ठिकाणी नाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, या मार्गावरून पायी जाणाऱ्या भाविकांसह पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे. रस्त्याची सद्यस्थिती पाहता अपघात होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.धार्मिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या माहूरच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी मूलभूत सुविधांची उपलब्धता आवश्यक आहे. मात्र, महत्त्वाच्या पर्यटनस्थळाकडे जाणाऱ्या मार्गाची अशी दुरवस्था होणे ही चिंतेची बाब आहे.

# पोलीस ठाण्यात तक्रार केल्याच्या कारणावरुन तरुणावर प्राणघातक हल्ला

## संदीप केंद्रेसह पंधरा ते वीस जणांविरुद्ध गुन्हा

किनवट/प्रतिनिधी-गोकुंदा येथे दुर्गा देवीच्या मिरवणुकीत झालेल्या वादातून आणि त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये अर्ज केल्याच्या रागातून एका तरुणावर तलवार, कोयता व चाकूंनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात संदीप केंद्रेसह पंधरा ते वीस जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी लघू उर्फ लव्ह पि. चिमणाजी मेटकर (वय ३५) रा.दतनगर गोकुंदा) हे मजुरी करतात. दि.२२ ऑक्टोबर रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास गोकुंदा येथील ठाकरे चौक येथे त्यांचा भाऊ दुर्गा देवीची मिरवणूक पाहत असताना, संदीप केंद्रे यांच्या मोटर सायकलने धडक दिल्यावरून बाचाबाची झाली. त्यानंतर थोड्याच वेळात संदीप केंद्रे, प्रदीप केंद्रे व त्यांच्या साथीदारांनी लघू मेटकर यांचे भाऊ सुनील मेटकर यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीविरोधात दि.२३ ऑक्टोबर रोजी पोलीस स्टेशन किनवट येथे तक्रार दाखल करण्यात आली. याच गोष्टीचा राग मनात धरून त्याच दिवशी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास ठाकरे चौक येथे संदीप केंद्रे, प्रदीप केंद्रे आणि इतर १० ते १५ जणांच्या जमावाने हातात तलवारी, कोयते व चाकू घेऊन फिर्यादी व त्यांच्या भावावर प्राणघातक हल्ला केला. हल्ला सुरू असताना जीव वाचवण्यासाठी पळत असताना आरोपी प्रदीप केंद्रे याने आज तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणत लघू मेटकर यांच्या डोक्यात व हातावर कोयत्याने वार केले. या हल्ल्यात लघू मेटकर हे गंभीर जखमी होऊन जमिनीवर कोसळले आणि त्यांना चक्कर आली. उपचारासाठी त्यांना आदिलाबाद येथील श्रीकृष्णा हॉस्पिटलमधील आयसीयू वॉर्डमध्ये दाखल करण्यात आले. उपचारानंतर लघु मेटकर हा शुध्दीवर आल्यानंतर त्यांनी दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी सुरुवातीला दाखल असलेल्या गुन्ह्यात आरोपींचे कृत्य प्राणघातक हल्ल्याचे असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे, पोलिसांनी गुन्हा कलमामध्ये वाढ करण्यात आली. संदीप केंद्रे, प्रदीप केंद्रे, समीर जयभाये, योगेश जयभाये, नागेश जयभाये, लक्ष्मण उर्फ लकी केंद्रे, पवन फड, बटी लाब, बालाजी नागरगोजे, सुमीत मुसळे, प्रमोद केंद्रे, सुरेश केंद्रे, सुधाकर भोयर, प्रमोद कोसरे, मुरलीधर मुंडे, अक्षय भोयर, राजू केंद्रे व इतर १५ जणांविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मॉर्निंग वॉकला गेलेल्या इसमाचा कारच्या धडकेत मृत्यू

उमरखेड/प्रतिनिधी-मॉर्निंग वॉकसाठी पत्नीसह-गेलेल्या एका ४० वर्षीय इसमाला भरधाव कारने जोरदार धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची थरारक घटना शनिवारी ब्राह्मणगाव-हरदडा रस्त्यावर घडली. कुलदीप गंगाधर हुलकाने वय ४०, रा. ब्राह्मणगाव, ता. उमरखेड असे मृत युवकाचे नाव असून त्याचे आई, वडील विडुळ येथेच वास्तव्यास आहेत. या घटनेमुळे ब्राह्मणगावसह विडुळ परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

कुलदीप हुलकाने हे शनिवारी सकाळी त्यांच्या पत्नीसह ब्राह्मणगाव-हरदडा रस्त्याने मॉर्निंग वॉक करून गावाकडे परत येत होते. याच वेळी ब्राह्मणगावकडून ढाणकीच्या दिशेने अत्यंत वेगाने जाणाऱ्या एम एच २६ सीवाय ६२७२ क्रमांकाच्या कारने हुलकाने यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. अपघाताची भीषणता इतकी प्रचंड होती की, धडक लागताच हुलकाने अनेक फूट हवेत उडून रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल नालीत कोसळले आणि गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.सदर घटनेतील कार एका पोलिस अधिकाऱ्याची असल्याची चर्चा परिसरात सुरू होती. घटनेची माहिती मिळताच उमरखेड पोलिस ठाण्याचे सहा.पो.उपनि.अमोल गुंडे आणि बीट जमादार दिलीप चव्हाण यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. याप्रकरणी कार चालकाविरुद्ध उमरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बालभारती पाठ्यपुस्तक समीक्षेसाठी शेषराव पाटील यांची निवड

माहूर/प्रतिनिधी-पुनर्रचित अभ्यासक्रम मराठी बालभारती इयत्ता पाचवी या पाठ्यपुस्तकाच्या समीक्षा सत्रासाठी माहूरचे जेष्ठ शिक्षक तथा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद शाखा माहूरचे तालुकाध्यक्ष एस.एस.पाटील यांची पुणे येथे बालभारतीने निवड केली असून त्याबाबतचे पत्र नुकतेच त्याना देण्यात आल्याने तहसीलदार अभिजीत जगताप यांनी त्यांचा पुस्तके देऊन सन्मान केला.



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ वेळोवेळी अभ्यासक्रम निश्चित करुन त्यामधे सुधार व निर्माणाचे काम सतत करते. मागील शैक्षणिक वर्षात सुद्धा जेष्ठ शिक्षक शेषराव पाटील यांना बालभारतीने आमंत्रित केले होते. आणि याही वर्षात त्यांना या चिकित्सक कार्यास आमंत्रित करण्यात आले आहे ही विशेष व अभिमानास्पद बाब आहे. मागील पस्तीस वर्षांपासून ते अदिवासी, डोंगराळ व वाडी तांड्यांनी व्याप्त असलेल्या माहूर किनवट या दुर्गम भागात कार्यरत आहेत. त्यांचा प्रदीर्घ व सर्वंकष सेवेचा विचार करत त्यांना नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा आदर्श शिक्षक जिल्हा गुणगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

# खासगी फायनान्स कंपन्यांच्या वसुलीची चौकशी करा

## भाजयुमोकडून कारवाईची मागणी



नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील खासगी फायनान्स कंपन्यांकडून होणारी कथित मनमानी कर्जवसुली, वाढते व्याजदर आणि शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी एका निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, महिला बचत गट आणि सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या आर्थिक समस्यांकडे निवेदनातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. खासगी फायनान्स कंपन्यांचे व्याजदर, कर्ज व्यवहार आणि वसुलीच्या पद्धतींची सखोल चौकशी करावी. कर्जवसुली दरम्यान नियमांचे उल्लंघन झाले आहे का, याची तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. तसेच महिला बचत गटांना देण्यात आलेल्या कर्जाच्या अटी, व्याजदर आणि वसुलीच्या पद्धतींची तपासणी करून संबंधितांना न्याय द्यावा, अशी भूमिका भाजयुमोने मांडली. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आणि शेतमजुरांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत कर्जाच्या परतफेडीचा वाढता ताण नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. त्यामुळे बाधित शेतकरी व शेतमजुरांना तातडीने आर्थिक दिलासा देण्यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४१५/२०२६
(CNR No.MHND10-001394-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रभावती भ्र.माधवराव मंगनाळे | वय-४५ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | प्रतीक्षा भ्र.किरण भुरे | वय-२१ वर्षे | धंदा-घरकाम |
| | रा.किनीकदु ता.अहमदपूर जि.लातूर | | |
| ३ | मयुरी पि.माधवराव मंगनाळे | वय-१९ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ४ | हनमंत पि.माधव मंगनाळे | वय-१८ वर्षे | धंदा-शिक्षण |

अर्जदार क्र.१, ३ व ४ फुलवळ ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडिल नामे माधव बाबुराव मंगनाळे हे होते. ते दिनांक ४/७/२०२६ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ यांची सासु व अर्जदार क्र.२ ते ४ यांची आजी नामे चंद्रकलाबाई बाबुराव मंगनाळे ही होती. ती यापूर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, माधव बाबुराव मंगनाळे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत माधव बाबुराव मंगनाळे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत माधव बाबुराव मंगनाळे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२५/११/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३०६/२०२६
(CNR No.MHND10-001385-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मंगलबाई भ्र.मारोती कदम | वय-४७ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | साईनाथ पि.मारोती कदम | वय-२२ वर्षे | धंदा-शेती |
| | अर्जदार क्र.१ ते २ रा.चौकी महाकाया ता.कंधार जि.नांदेड | | |
| ३ | लक्ष्मी भ्र.विठ्ठल वडजे | वय-२५ वर्षे | धंदा-घरकाम |
| | रा.खंडगाव (ह) ता.कंधार जि.नांदेड | | |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडिल नामे मारोती गोविंद कदम हे होते. ते दिनांक २२/१०/२०२५ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ यांची सासु व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी नामे गंगाबाई गोविंदराव कदम ही होती. ती यापूर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, मारोती गोविंद कदम यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत मारोती गोविंद कदम यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत मारोती गोविंद कदम यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२५/११/२०२६

आज रोजी दि.१९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३९४/२०२६
(CNR No.MHND10-001315-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कमलबाई भ्र.व्यंकटराव माकणे | वय-७० वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | बालाजी पि.व्यंकटराव माकणे | वय-५० वर्षे | धंदा-नौकरी |
| | रा.बारुळ ता.कंधार जि.नांदेड ह.मु.तरोडा बु.ता.जि.नांदेड | | |
| ३ | शिवाजी पि.व्यंकटराव माकणे | वय-४३ वर्षे | धंदा-मजुरी |
| ४ | अर्चना पि.व्यंकटराव माकणे | वय-४२ वर्षे | धंदा-घरकाम |
| | सर्व रा.बारुळ ता.कंधार जि.नांदेड | | |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारचे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ चे वडिल नामे व्यंकटराव खंडोजी माकणे हे होते. ते दिनांक १७/१०/२०२० रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की, व्यंकटराव खंडोजी माकणे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत व्यंकटराव खंडोजी माकणे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत व्यंकटराव खंडोजी माकणे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२७/११/२०२६

आज रोजी दि.९/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

# बालाजी शिखरे यांचे निधन

लोहा/प्रतिनिधी-तालुक्यातील जवळा (दे) येथील रहिवासी बालाजी सखाराम शिखरे (वय ६१) यांचे शनिवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार असून रविवार २५ ऑक्टोबर रोजी जवळा (दे) येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



CHANGE IN NAME

My (old name) is **ABDUL RASHEED QURESHI** which now I am, changing as (new name) **ABDUL RASHEED ABDUL GANI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**ABDUL RASHEED ABDUL GANI**
R/o H.NO. 236 B.NO.11,NEAR NOBLE SCHOOL LABOUR COLONY
NANDED-431602
Mob.no. 9326698127

CHANGE IN NAME

My (old name) is **QUAZI NOORJAHA BEGUM AZIMODDIN** which now I am, changing as (new name) **QUAZI NOORJAHAN BEGUM AZIMODDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**QUAZI NOORJAHAN BEGUM AZIMODDIN**
R/o 9-7-05, HYDERBAGH NO.1,NEAR HYDER FUNCTION HALL DEGLOOR NAKA
NANDED-431604
Mob.no. 9960729328

# निवडणुकीच्या तोंडावर आनंदाचा शिधा; सणासुदीच्या काळात मात्र निराशा

## महागाईच्या झळा सोसणाऱ्या गोरगरिबांची दिवाळी कशी गोड होणार?

माहूर/प्रतिनिधी-निवडणुकीच्या तोंडावर मतदारांना आकर्षित करण्यासाठी आनंदाचा शिधाच्या माध्यमातून तेल, चणाडाळ, साखर, रवा आणि गहू यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करणाऱ्या शासनाकडून आता ऐन सणासुदीच्या काळात मात्र हात आखडता घेतल्याचे चित्र दिसत आहे. रक्षाबंधन, श्रीरामनवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गणेशोत्सव आणि दिवाळीसारख्या सणांच्या निमित्ताने यापूर्वी आनंदाचा शिधा वितरित करण्यात आला होता. मात्र, यंदा दिवाळीच्या तोंडावर रास्त धान्य दुकानांमधून केवळ गहू आणि तांदळाचे वितरण होत असल्याने सर्वसामान्य लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या काळात गोरगरीब कुटुंबांना तेल, डाळ, साखर, रवा आणि गहू यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचा आनंदाचा शिधा मिळाला. मात्र, आता दिवाळीसारखा महत्त्वाचा सण तोंडावर असताना या शिध्याचा पत्ताच नसल्याने लाभार्थ्यांची निराशा झाली आहे. निवडणुकीच्या काळात मिळणाऱ्या सुविधांचा सणासुदीच्या काळात मात्र विसर पडत असल्याने शासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.निवडणुकीच्या काळात सर्व प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंचा आनंदाचा शिधा मिळाला; मग आता दिवाळीतच या वस्तूंचा पुरवठा का बंद झाला, असा संतप्त सवाल महिला लाभार्थी उपस्थित करत आहेत. दिवाळीच्या सणाला घरात गोडधोड बनवायचे, मुलांबाळांचे सण आनंदात साजरे करायचे, मात्र दुसरीकडे दुष्काळी परिस्थितीमुळे हाताला काम नाही, उत्पन्नाचे साधन नाही आणि बाजारात जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. अशा परिस्थितीत शासनाला निवडणुकीच्या काळातच गरीब जनतेची आठवण होते का, असा सवालही महिला लाभार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे. एकीकडे गोरगरीब जनतेला सणांचा आनंद घेता यावा, यासाठी विविध योजनांच्या घोषणा केल्या जातात; तर दुसरीकडे प्रत्यक्षात आवश्यक वस्तूंचा पुरवठाच होत नसेल, तर या योजनांचा उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. बाजारात खाद्यतेलाचे दर दोनशे रुपयांच्या आसपास, तांदळाचे दर शंभर रुपये किलोच्या पार, तर साखरेचे दर साठ रुपये किलोच्या पुढे गेल्याने सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटचे गणित कोलमडले आहे. महागाईच्या या झळा सोसणाऱ्या कुटुंबांना दिवाळीचा सण साजरा करणेही कठीण झाले आहे. निवडणुकीच्या काळातील आनंदाचा शिधा आणि दिवाळीच्या काळातील त्याचा अभाव हा विरोधाभास आता सर्वसामान्यांच्या मनात असंतोष निर्माण करत आहे.

# शहजाद भट्टी नेटवर्कबाबत पोलीस अधीक्षकांनी दिला नागरिकांना सतर्कतेचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी-शहजाद भट्टी नेटवर्कबाबत पोलीसांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणांशी संपर्क साधून त्यांना कथित देशविघातक कारवायांकडे वळविण्याचा प्रयत्न होवू शकतो. त्यामुळे युवकांसह सर्व नागरिकांनी इन्स्ट्राग्राम, फेसबुक, व्हॉटसअॅप आणि अन्य सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अनोळखी व्यक्तींकडून येणाऱ्या संदेशाबाबत सतर्क राहावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी केले आहे.

काही महिन्यांपूर्वी नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना पाकिस्तानस्थित शहजाद भट्टी नेटवर्क संदर्भात सतर्कतेचे आवाहन करण्यात आले होते. या नेटवर्कच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या काही तरुणांशी संपर्क साधला जात असल्याची माहिती समोर आली होती. अशा संपर्काद्वारे तरुणांना जाळ्यात ओढून देशविघातक कृत्यांसाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. शहजाद भट्टी नेटवर्क हे पाकिस्तानस्थित नेटवर्क असल्याचे तपास यंत्रणांच्या माहितीतून समोर आले आहे. या नेटवर्ककडून सोशल मीडिया आणि अन्य डिजिटल माध्यमांचा वापर करुन तरुणांशी संपर्क साधणे, त्यांचे कट्टरपंथीकरण करणे तसेच त्यांना बेकायदेशीर किंवा देशविघातक कारवायांकडे वळविण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप तपास यंत्रणांकडून करण्यात आले आहेत. केंद्र सरकारने शहजाद भट्टी नेटवर्कला बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम अंतर्गत दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तीकडून येणाऱ्या संशयास्पद संपर्काकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# किवळा साठवण तलावात मूर्ती विसर्जनासाठी परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-आगामी काळात मोठे जलसंकट येण्याची भीती व्यक्त होत असताना किवळा तलावात मूर्ती विसर्जनास कोणत्या अधिकाऱ्यांनी कोणत्या अधिकारात परवानगी दिली याची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशी मागणी ज्येष्ठ समाजसेवक सिद्धार्थ तलवारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात तलवारे यांनी म्हटले आहे की, कै.डॉ. शंकररावजी चव्हाण विष्णुपूरी प्रकल्पांतर्गत समाविष्ट असलेला लोहा तालुक्यातील किवळा साठवण तलावाचा उपयुक्त पाणीसाठा शहराची तहान भागविण्यासाठी वापरण्यात येतो. सध्या या तलावासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. महाराष्ट्र शासनाने दुष्काळ जाहीर केलेला आहे. विष्णुपूरी प्रकल्पाचे रब्बी आवर्तन देखील रद्द करण्यात आले आहे. नांदेड शहरासाठी नागरी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या किवळा येथील साठवण तलावात गणेश व दुर्गा मूर्तींचे विसर्जन करण्यात आल्यामुळे पाणी दुषित होत आहे. तसेच पाणीसाठा घटत आहे.अशा परिस्थितीत मोठमोठ्या मूर्तींचे किवळा साठवण तलावात विसर्जन करणे अत्यंत घातक असेच आहे. मूर्ती विसर्जनामुळे पी.ओ.पी. व पाण्यात न विरघळणारे साहित्य तलावात साचून पाणी दूषित तर होईलच शिवाय पाणीसाठ्यात घट होणार आहे.दुष्काळजन्य परिस्थितीत मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम पर्यायी व्यवस्था करावयास हवी होती. तथापि अधिकाऱ्यांनी कोणत्या अधिकारात मूर्ती विसर्जनासाठी परवानगी दिली हे अनाकलनीय आहे. अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशी मागणी सिद्धार्थ तलवारे यांनी केली आहे.

# दुष्काळग्रस्तांसाठी आ.चिखलीकर यांचे एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात देण्यासाठी आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दिले आहे. या वेतनाचा धनादेश त्यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार उपस्थित होत्या.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा संकटाच्या काळात दुष्काळग्रस्तांना मदत मिळावी आणि त्यांना दिलासा मिळावा, या उद्देशाने आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी आपल्या एका महिन्याच्या वेतनाची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला. या माध्यमातून



# ऊस उत्पादन वाढविण्यासाठी शिवारातच पाचट कुजविण्याचे आवाहन

हदगाव/प्रतिनिधी-यंदा कमी पर्जन्यमानामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, पाण्याची कमतरता आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे ऊस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत उसाचे उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी तसेच जमिनीतील ओलावा आणि सुपीकता वाढविण्यासाठी ऊस तोडणीनंतर शेतात शिल्लक राहणाऱ्या पाचटाचे योग्य व्यवस्थापन करावे असे आवाहन शिऊर साखर कारखाना व सुभाष शुगर प्रा. लि.चे.डे. जनरल मॅनेजर मधुकर पतंगें यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

शिरूर साखर कारखाना लि., वाकोडी, ता. कळमनुरी आणि श्री सुभाष शुगर प्रा. लि., हडसणी, ता. हदगाव, जि. नांदेड कारखान्यांच्या वतीने गाळप हंगाम २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पाचट व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. ऊस उत्पादकांनी आपला ऊस इतर कारखान्यांना न देता संबंधित कारखान्यांना गाळपासाठी देऊन सहकार्य करावे. पाचटाचे आच्छादन केल्यास शेतकऱ्यांना अनेक फायदे ऊस तोडणीनंतर शेतात राहणारे पाचट हे




निरुपयोगी नसून योग्य पद्धतीने वापरल्यास ते जमिनीच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरते. पाचटाचे आच्छादन केल्यामुळे जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होते. परिणामी, पिकाला वारंवार पाणी देण्याची गरज कमी होऊ शकते आणि सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्याची बचत होते.शेतातील पाचट जाळल्यामुळे जमिनीतील सेंद्रिय पदार्थ आणि उपयुक्त सूक्ष्मजीवांचे नुकसान होऊ शकते. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होण्यासह जमिनीच्या सुपीकतेवरही प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. तसेच पाचट जाळल्यामुळे धूर आणि वायुप्रदूषण निर्माण होऊन पर्यावरणालाही हानी पोहोचते.

# दुष्काळग्रस्त दोनशे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी नीट,जेईई व सीईटीचे मोफत मार्गदर्शन

नांदेड/प्रतिनिधी-दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने नीट,जेईई व सीईटी प्रवेश परीक्षांसाठी मोफत मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे महागडे खासगी कोचिंग घेता न येणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या उपक्रमांतर्गत दोनशे विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.

इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या जिल्हा परिषद हायस्कूल तसेच ग्रामीण भागातील खासगी अनुदानित हायस्कूलमधील विद्यार्थ्यांसाठी डिसेंबर २०२६ मध्ये प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेच्या माध्यमातून गुणवंत, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना पुढील तयारीसाठी मोफत कोचिंग उपलब्ध करून दिले जाईल. नीट,जेईई व सीईटी या प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना दर्जेदार व नियोजनबद्ध शैक्षणिक मार्गदर्शन देण्यात येणार आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक तयारी करण्याची संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या उपक्रमातून मिळणार आहे. दुष्काळी परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आर्थिक अडचणींचा परिणाम होऊ नये, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि गुणवत्तेच्या बळावर उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. ग्रामीण भागातील अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.-

## जाहीर समन्स

नांदेड येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
समक्ष श्री एस.एम.कोलेकर, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश
वरिष्ठ स्तर,नांदेड
विशेष दिवाणी दावा क्र.६६/२०२६,
जाहेद अन्वर पी.मोहम्मद अब्दुल रशीद विरुद्ध नागोराव
माधवराव पाचलिंग

प्रती,
प्रतिवादी
नागोराव माधवराव पाचलिंग
वय ५१ वर्षे, धंदा-शेती, रा.मुदखेड, ता.मुदखेड,जि.नांदेड
मो.९८५०२९७३४५

ज्याअर्थी उपरोक्त वादातील वादी जाहेर अन्वर पी.मोहम्मद अब्दुल रशीद, वय ५१ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा.इतवारा, ता. व जि. नांदेड यांनी आपल्या विरुद्ध वरीलप्रमाणे दावा दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात आपणास प्रतिवादी केलेले आहे. सदर प्रकरणात आपणास आपली बाजू मांडण्याकरिता या न्यायालयातर्फे बऱ्याच वेळा अर्जात नमूद पत्यावर समन्स पाठविण्यात आले होते. परंतु असे दिसून येत आहे की, नमूद पत्यावर आपण मिळून येत नाहीत किंवा आपला ठावठिकाणा आढळत नाही, किंवा आपण जाणूनबुजून सदर प्रकरणातील समन्स स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहात.

त्याअर्थी उपरोक्त नमूद प्रकरणात आपल्या नावे हे जाहीर समन्स पाठविण्यात येत असून, आपणास याद्वारे सुचित करण्यात येते की, आपण स्वतः अगर वकिलामार्फत दिनांक २६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपरोक्त प्रकरणात हजर होवून आपली बाजू मांडावी, नसता आपणास या प्रकरणात काहीही सांगावयाचे नाही असे समजून उपरोक्त प्रकरण आपल्या विरुध्द एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

आज रोजी दि.१६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| | आदेशावरुन |
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **कनिष्ठ लिपीक** | **सहाय्यक अधिक्षक** |
| दिवाणी न्यायालय | दिवाणी न्यायालय, वरिष्ठ |
| दि.न्या.व.स्तर,नांदेड | स्तर,नांदेड |

# रब्बी हंगामासाठी इसापूर डाव्या कालव्यातून पाण्याची पहिली पाळी सुरु



उमरखेड/प्रतिनिधी-ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाचा रब्बी हंगामासाठी पहिली पाणी पाळी शनिवार,२४ ऑक्टोबर रोजी सकाळी इसापूर डाव्या कालव्यातून सोडण्यात आली आहे.

ऐन रब्बीच्या तोंडावरच सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्यामुळे उमरखेड तालुक्यातील कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पाण्यामुळे हरभरा, करडई, रब्बी ज्वारी व चारा पिके यांच्या पेरण्या आणि ओलिताला मोठा वेग येणार आहे. उपलब्ध पाणी शेवटच्या टोकापर्यंत सुरळीत पोहोचावे यासाठी ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभागाचे अधिकारी व कर्मचारी कालवा क्षेत्रावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.दरम्यान, पाण्याची उपलब्धता मर्यादित असल्याने शेतकऱ्यांनी पाण्याचा अपव्यय टाळावा, काटकसरीने वापर करावा तसेच कालवा फोडणे किंवा कालव्याच्या गेटची नासधूस करणे असे प्रकार टाळावेत. शक्यतो ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन जलसंपदा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पांडुर्णा घाटात मोटारसायकल अडवून चोरट्यांनी लुटले

भोकर/प्रतिनिधी-मोटारसायकल अडवून खंजीरचा धाक दाखवून बेल्टने मारहाण करुन मोटार सायकलस्वारास १५ हजार रुपयास लुटल्याची घटना पांडुर्णा घाटात २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता घडली. या प्रकरणी चार आरोपींना भोकर पोलिसांनी अटक करुन न्यायालयासमोर उभे केले असता दोन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली.

फिर्यादी अनिकेत रामदास भुरके रा.वाळकेवाडी ता.हिमायतनगर हे आपल्या मुलांची परीक्षेची फीस भरण्यासाठी मांजरम येथे मुदखेड मार्गे मोटारसायकलवरुन जात असताना पांडुर्णा शिवारात आरोपी रविकुमार दत्तात्रय कोरंटलू, हरिदास लकलवाड, अंकुश लकलवाड, भगवान बोईनवाड या चौघांनी मिळून मोटार सायकल अडवली. रामदास भुरके यांना खंजरचा धाक दाखवून बेल्टने मारहाण करुन त्यांच्याजवळील नगदी ४ हजार ५०० व मोबाईल असा एकूण १५ हजार रुपयांचा ऐवज जबरीने लुटून चोरट्यांनी पळ काढला. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्याच दिवशी पोहेकॉ राजेश घुन्नर, शिवाजी जिंकलवाड यांनी आरोपींना अटक केली.

पान १ वरुन

## मध्य रेल्वे पुन्हा...

ओव्हरहेड वायरवर अज्ञात वस्तू लटकत आढळून आल्याने मध्य रेल्वेची उपनगरीय रेल्वे सेवांचे वेळापत्रक विस्कळीत झाले. गाड्या उशिराने धावत आहेत. यामुळे, प्रवाशांना विलंबाचा सामना करावा लागत आहे. प्रवाशांनी गैरसोयीबद्दल सहकार्य करावे, असे आवाहन मुंबई विभागाच्या रेल्वे व्यवस्थापकांनी सोशल मीडियाद्वारे केले आहे.कांजूरमार्ग स्थानकातील रिले रूममध्ये धूर आढळल्याने आणि ओव्हरहेड वायरवरील कामासाठी ब्लॉक घेण्यात आल्याने मुंबई उपनगरीय रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली आहे.

## दुष्काळाने शेती उद्ध्वस्त;...

आता शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे. नुकसान झाले हे उघड्या डोळ्यांनी दिसत असताना मदतीसाठी आणखी किती पुरावे द्यायचे? शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेण्यासाठी आणखी किती पाहण्या करायच्या? पंचनाम्यांच्या फेऱ्या, प्रशासकीय अहवाल आणि कागदी प्रस्तावांच्या चक्रव्यूहात मदतीचा निर्णय अडकून पडला आहे. शासनाची यंत्रणा कागदोपत्री हालचाली करण्यात व्यस्त असताना शेतकऱ्यांच्या हातातील पैसा संपत चालला आहे. दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गडद होत असताना मदतीचा निर्णय मात्र अजूनही धूसर आहे. एका बाजूला कर्जाचे हप्ते, दुसऱ्या बाजूला घरखर्च आणि तिसरीकडे मुलांच्या शिक्षणाची चिंता, शेतकरी कुटुंबांसमोर प्रश्नांचा डोंगर उभा आहे. कर्जाची परतफेड कशी करायची? घरातील चूल कशी पेटवायची? मुलांचे शिक्षण कसे सुरू ठेवायचे? मुलीचे लग्न कसे करायचे? या प्रश्नांनी शेतकरी कुटुंबांची झोप उडाली आहे. शेतात उत्पन्न नाही, हाताला काम नाही आणि बाजारातही दिलासा नाही. अशा परिस्थितीत केवळ आश्वासनांच्या गाजरावर शेतकऱ्यांना किती दिवस जगवणार? दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या बळीराजाला सरकारने वाऱ्यावर सोडले आहे काय? असा संतप्त सवाल शेतकरी करीत आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४